# परींकर रमले मायभूमीच्या आठवणींत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

साधी-भोळी शांतताप्रिय माणसे, गोव्याची मासळी आणि मंगेशकर-अभिषेकींसारखी समृद्ध सांस्कृतिक परंपरा...देशाचे संरक्षणमंत्रिपद भूषवणारे मनोहर पर्रीकर मायभूमी गोव्याच्या आठवणींत गुरुवारी रंगून गेले... 'मंत्रिपदे निश्चितच महत्त्वाची आहेत, पण या सर्व बाबींमुळे आपल्याला गोव्यात राहणेच अधिक आवडते,' अशीही पुस्ती त्यांनी जोडली. समदा प्रकाशनाच्या 'माझ्या गोव्याच्या भूमीत' आणि 'शाळेतील दिवस' या पुस्तकांचे प्रकाशन पर्रीकर आणि राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते झाले. गोव्यातील समृद्ध परंपरा, तसेच विविध क्षेत्रांमधील मान्यवरांच्या शालेय जीवनातील आठवणींवर ही पुस्तके आधारित आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, 'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर आणि समदा प्रकाशनाच्या मनस्विनी प्रभुणे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.



**समदा प्रकाशनाच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना डावीकडून 'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर, शिक्षणमंत्री विनोद तावडे, संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर, समदा प्रकाशनाच्या मनस्विनी प्रभुणे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य.**

'लता मंगेशकर-जितेंद्र अभिषेकी यांच्यासारखे संगीतातील दिग्गज, बा. भ. बोरकरांसारखे कवी, डॉ. रघुनाथ माशेलकर आणि डॉ. अनिल काकोडकर यांच्यासारखे वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रांमधील गुणवंतांची समृद्ध परंपरा गोव्याला आहे. येथील माणसे साधी-भोळी आणि शांतताप्रिय आहेत, पण त्यांना योग्य-अयोग्य बाबींची पूर्ण जाण आहे. त्यामुळेच मंत्रिपदे भूषवत असलो, तरी मला गोव्यात राहणेच अधिक आवडते,' असे पर्रीकर यांनी नमूद केले.

दरम्यान, 'राज्यभरात शिक्षणामध्ये सुरू असलेल्या विविध प्रयोगांचा अभ्यास राज्य सरकारचा शिक्षण विभाग करत असून, येत्या काही काळातच त्याचा रिझल्ट दिसून येईल,' असे तावडे म्हणाले. या वेळी जोगळेकर आणि वैद्य यांचीही भाषणे झाली. प्रभुणे यांनी प्रास्ताविक केले.